# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### शहीद संजयभाऊ ताकतोडे यांच्या कुटुंबातील सदस्यास शासकीय नोकरीमध्ये सामावुन घेण्याबाबत

**(१) ७४० (०८-०४-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहीद संजय ताकतोडे यांनी गत पाच वर्षांपूर्वी मातंग समाजास आरक्षण वर्गीकरण, शैक्षणिक तसेच आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून मातंग समाजासाठी जलसमाधी घेतली होती तसेच सदर घटनेनंतर शहीद ताकतोडे यांच्या कुटुंबीयांतील एका व्यक्तीस शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आश्वासनाच्या अनुषंगाने शहीद ताकतोडे यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१९-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील अनुदानित वस्तीगृहांतील कर्मचाऱ्यांना अपुरे मानधन देण्यात येत असल्याबाबत

**(२) ७५० (०९-०४-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना आदिवासी शाळांतील कर्मचाऱ्यांच्या तुलनेत कमी मानधन देण्यात येत असल्याने यासंदर्भात विविध संघटनांनी वेळोवेळी आंदोलने केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांचे मानधन वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (२९-०९-२०२५) :** (१) होय.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना मानधनात वाढ करण्याबाबत दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ च्या शासन निर्णयान्वये खालील तकत्यात नमुद केल्याप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | दिनांक १ फेब्रुवारी,२०२२ च्या शासन निर्णयान्वये सुधारित मानधन |
|---|---|---|
| १. | अधीक्षक | रुपये १०,०००/- |
| २. | स्वयंपाकी | रुपये ८,५००/- |
| ३. | मदतनीस | रुपये ७,५००/- |
| ४. | चौकीदार | रुपये ७,५००/- |

अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांनी मा.मंत्री (सा.न्या.) यांना स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याच्या संदर्भात निवेदने सादर केली होती. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/०५/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वयंसेवी संस्था संचलित अनुदानित वसतिगृहातील अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस, चौकीदार या मानधन तत्वावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात महागाई निर्देशांकानुसार वाढ करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जात पडताळणी प्रमाणपत्र प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्याबाबत

**(३) ८७३ (०९-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, शासकीय अधिकारी/ कर्मचारी वर्गांकडून दुर्लक्ष झाल्यास संबंधित फाईल तशीच पडून राहत असल्याने सदर प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने करण्याची मागणी वारंवार होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०४-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जात पडताळणी प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने दिनांक ०१/०८/२०२० पासून संगणक प्रणालीद्वारे देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यातील पात्र ज्येष्ठ नागरिकांना तीर्थदर्शनास नेण्याबाबत

**(४) १२७९ (१५-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कमी उत्पन्न असलेल्या ६० वर्षांवरील सर्वधर्मीय ज्येष्ठांना मोफत तीर्थदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना शासनाने निवडणुकीपूर्वी जाहीर केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया जिल्ह्यातील १४९३ ज्येष्ठांनी सदर तीर्थदर्शन योजनेसाठी अर्ज केला होता तसेच अयोध्येसाठी रेल्वेची बुकींगही करण्यात आली होती, मात्र निवडणूक आल्याने सदर दौरा रद्द करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन महिने उलटूनही पात्र ठरविलेल्या १२४६ ज्येष्ठांच्या दौऱ्याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तीर्थदर्शन योजनेसाठी पात्र ठरलेल्या सदर ज्येष्ठ नागरिकांना दौऱ्यावर नेण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१४-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यात आंतरजातीय विवाह योजनेचे अनुदान वितरीत करणेबाबत

**(५) १५४४ (१५-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे आंतरजातीय विवाह योजनेंतर्गत अनुदानाचे सुमारे २०० प्रस्ताव निधीअभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंतरजातीय विवाह योजनेचे अनुदान तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१७-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर योजनेंतर्गत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव कार्यालयाकडील प्रस्तावांकरीता दिनांक १८/०२/२०२५ रोजी रुपये ९४.०० लाख निधी वितरीत केला असून त्यानुसार १८८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. तसेच, माहे मे,२०२५ अखेर प्रलंबित १०८ प्रस्तावांसाठी रुपये ५४.०० लाख निधी दिनांक १२/०९/२०२५ च्या शासन ज्ञापनान्वये वितरीत करण्यात आलेला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जातींमधील असमतोल व वर्गीकरणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारी किंवा सूचनांबाबत

**(६) १८७९ (१५-०४-२०२५) श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती (एस.सी.) आरक्षणामध्ये उपवर्गीकरणाचा प्रारूप आराखडा तयार करण्यासाठी न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजीपर्यंत शिफारशी व अहवाल सादर करणे अपेक्षित असताना या समितीला अंतिम अहवाल सादर करण्यासाठी ८ महिन्यांची मुदतवाढ दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त समितीच्या अहवालास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, न्या. बदर समिती व्यतिरिक्त अनुसूचित जातींमध्ये असणाऱ्या असमतोलासंबंधी संघटना, आंदोलक किंवा अभ्यासकांनी शासनाकडे अहवाल, चर्चा अथवा पत्रव्यवहार केला आहे काय, अनुसूचित जातींमध्ये असलेल्या जातींपैकी एका विशिष्ट जातीला आरक्षणाचा सर्वाधिक लाभ मिळाल्याचा कोणत्या संघटना किंवा व्यक्तींनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे काय व अनुसूचित जातींमध्ये उपजातींनुसार आरक्षणाचा किती जणांना लाभ झाला याबाबतची आकडेवारी काय आहे,

(४) असल्यास, अनुसूचित जातींच्या असमतोलाबाबत आणि उपवर्गीकरणाबाबत शासनाकडे आलेल्या तक्रारी किंवा सूचनांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (०४-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रस्तुत विषयी समिती स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमध्ये आरक्षणाचे वर्गीकरण करुन यादीमध्ये सुधारणा करणेबाबत

**(७) १८८२ (१५-०४-२०२५) श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास बहुजन कल्याण विभागाने दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी शासन परिपत्रक काढून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाची यादी जाहीर केली असून सदर यादीमध्ये जाती व तत्सम घटक यांचे वर्गीकरण करण्यासह आरक्षणाची मर्यादा जाहीर करण्यात आली असून त्याचप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील जाती व तत्सम घटकांचा शासन विचार करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जातीमध्ये आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचे तसेच अनुसूचित जाती संदर्भातील नियमन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अनुसूचित जातीमध्ये आरक्षणाचे वर्गीकरण करुन यादीमध्ये सुधारणा तसेच नियमन करण्याच्यादृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१०-१०-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा उपवर्गीकरणाचा प्रारुप आराखडा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा उपवर्गीकरणाचा प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक १५/१०/२०२४ अन्वये मा.न्या.श्री.अनंत मनोहर बदर (से.नि.),मा.उच्च न्यायालय, पाटणा यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस शासन निर्णय, दिनांक १२/०९/२०२५अन्वये दिनांक १४/०३/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रस्तुत विषयी समितीस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जातीच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबतच्या नियमावलीत बदल करण्याबाबत

**(८) २०३८ (१५-०४-२०२५) श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जातीतील व्यक्तींना शिक्षणात, नोकरीमध्ये, राजकीय किंवा इतर क्षेत्रात आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असून जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सन १९५० पूर्वीचे पुरावे जोडावे लागतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांना सन १९५० पूर्वीची शैक्षणिक किंवा महसूली कागदपत्रे मिळविणे अशक्य असल्यामुळे अनेक व्यक्तींना सदर प्रमाणपत्र मिळत नसल्याने त्यांना आरक्षण व इतर सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुसूचित जातींसाठी देण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्राच्या सध्याच्या नियमावलीत बदल करून सन १९५० पूर्वीचे पुरावे न मागता अर्जाच्या तारखेपासून ५० वर्षे जुने पुरावे स्वीकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१९-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) "महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व "महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन), नियम २०१२" मधील तरतूदीं व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार अर्जदारास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

उक्त नियम, २०१२ मधील नियम २ (ड) नुसार अनुसूचित जातीकरीता मा.राष्ट्रपतींचा संविधान आदेशाचा दिनांक १० ऑगस्ट, १९५० हा "मानीव दिनांक" म्हणून निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार संबंधीतास त्यापूर्वीचे महाराष्ट्रातील अधिवासाचे पुरावे सादर करणे अत्यावश्यक आहे. सदर मानीव दिनांकामध्ये बदल करण्याचे अधिकार राज्य शासनास नसून तो मा.राष्ट्रपती महोदयांना आहे.

जर, अर्जदार जात वैधता प्रमाणपत्राकरीता अर्ज सादर करताना उपरोक्त मानीव दिनांकापूर्वीचा महाराष्ट्रातील मूळ अधिवास सिध्द करणेसाठी कागदपत्रे सादर करु शकला नाही, तर समितीच्या अंतर्गत कार्यरत दक्षता पथकामार्फत अर्जदाराच्या सद्याच्या / तत्कालीन अधिवास असलेल्या ठिकाणी जाऊन त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच व्यावसायिक बाबींची सखोल चौकशी करुन तसेच गावातील बुजूर्ग/स्थानिक प्रतिष्ठीत गावकरी/ लोकप्रतिनिधी यांचे जबाब नोंदवून दक्षता पथक जात पडताळणी समितीस सविस्तर अहवाल सादर करतात. यामध्ये अर्जदाराकडे पुरेशी कागदपत्रे जरी उपलब्ध नसली तरी अर्जदारास जातीदावा सिध्दतेबाबत त्याचे म्हणणे जात पडताळणी समितीसमोर मांडण्यासाठी संपूर्ण संधी दिली जाते. तरीही, अर्जदाराच्या जातीदाव्याबाबत काही संदिग्धता असल्यास जात पडताळणी समिती अर्जदारास त्यांच्या जाती दाव्याच्या सिध्दतेसाठी अर्जदाराची affinity Test घेतली जाते.

उक्त अधिनियम व नियमातील तरतुदींन्वये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अर्जदारास नैसर्गिक न्याय तत्त्वावर पुरेशी संधी देवून गुणवत्तेनुसार जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत निर्णय घेते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या मुख्यमंत्री वयोश्री योजनेबाबत

**(९) २१२० (१५-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ अखेर ६५ वर्ष पूर्ण झालेल्या व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०२४ रोजी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री वयोश्री योजनेतून दर महिन्याला ३,००० रुपये देण्याचे जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत अर्ज केलेल्या साडेसहा लाख ज्येष्ठ नागरिकांपैकी सुमारे चार लाख लाभार्थ्यांना तीन महिन्यांपासून मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी माहिती घेऊन वंचित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१४-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सदर योजनेतंर्गत एकवेळ एकरकमी रूपये ३०००/- थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे अनुदान देण्यात येते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ’एक राज्य, एक नोंदणी’ योजना प्रलंबित असल्याबाबत

**(१०) २३४९ (१०-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ‘एक राज्य, एक नोंदणी’ ही योजना राज्यात दिनांक १ मे, २०२५ पासून लागू करण्यात आली असल्याचे शासनाने जाहीर केले असतानाही अनेक जिल्ह्यांमध्ये अद्यापही जमीन व मालमत्ता खरेदीसाठी जुनी नोंदणी प्रक्रियाच राबविली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ‘कोणत्याही नोंदणी कार्यालयातून राज्यातील कोणत्याही ठिकाणची जमीन किंवा मालमत्ता खरेदी-विक्रीची नोंदणी करता येईल’ असे जाहीर करूनही संबंधित विभागाकडून डिजिटलीकरण, सॉफ्टवेअर प्रणाली, कर्मचारी प्रशिक्षण व अधिसूचना प्रसिध्द करण्यास विलंब झाल्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे दस्तऐवजांच्या शुध्दतेबाबत, करभरणा तपशील, बाजारभाव मूल्यांकन व डिजिटल स्वाक्षरीबाबत त्रुटी निर्माण होत असल्यामुळे खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये गैरव्यवहार किंवा फसवणुकीचे प्रमाण वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील पार्श्वभूमीवर, ‘एक राज्य, एक नोंदणी’ योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणा उभारण्याकरीता तसेच कर्मचारी व अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, सॉफ्टवेअर प्रणालीचे कार्यान्वयन व नागरिकांमध्ये जनजागृती यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२५-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) “एक राज्य एक नोंदणी” या राज्य़ शासनाच्या महत्वाकांक्षी कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात “एक जिल्हा एक नोंदणी” असे जिल्हास्तरावर नोंदणीचे सामाईक क्षेत्र दिनांक ०१/०५/२०२५ पासून लागू केले आहे.

”एक जिल्हा एक नोंदणी” या संकल्पनेची माहिती सर्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यातील सर्व कार्यालयांमध्ये दर्शनी भागात सविस्तर माहिती फलक लावण्यात आले आहेत. तसेच कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना देखील याची समक्ष माहिती देण्यात येत आहे.

“एक जिल्हा एक नोंदणी” या पध्दतीची अंमलबजावणी करताना, संभाव्य गैरप्रकार, फसवणूक इत्यादी टाळण्यासाठी महसूल व वन विभाग, परिपत्रक दिनांक ०६/०६/२०२५ अन्वये राज्यातील सर्व दुय्यम निबंधकांना मार्गदर्शक सूचना दिल्या असून त्यानुसार दुय्यम निबंधकांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

या पध्दतीनुसार राज्यात, संबंधित तालुक्याबाहेरील मात्र त्याच जिल्ह्यातील अन्य दुय्यम निबंधकांकडे दिनांक ०१/०५/२०२५ ते दिनांक ३०/०६/२०२५ या कालावधीत ३२,०६७ इतकी दस्तनोंदणी झाली आहे. या पध्दतीचा नागरिक मोठ्या प्रमाणावर लाभ घेत असल्याचे यावरुन दिसून येते.

सध्या राज्यात "एक जिल्हा एक नोंदणी" ही प्रणाली कार्यान्वित आहे. या प्रणालीचा अनुभव विचारात घेऊन तसेच येणाऱ्या अडचणींवरील उपाययोजनांचे अभ्यासपूर्ण नियोजन करुन त्यानंतर पुढील टप्यात शासन निर्देशानुसार "एक राज्य एक नोंदणी" ही प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिक्षाभूमी (नागपूर) लगतच्या संत चोखामेळा शासकीय मुलींचे वसतिगृहामध्ये ग्रंथालय, वाचनकक्ष, इंनडोअर गेम व अशा सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) २६३१ (१०-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या नागपूर येथील दिक्षाभूमी लगतच्या संत चोखामेळा शासकीय वसतिगृहाच्या एकूण १३ मजली इमारत उभारण्यासाठी रुपये ७८ कोटींचा निधी खर्च करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृहात निवासी मुलींसाठी ग्रंथालय, वाचनकक्ष, इनडोअर गेम्स व इतर शैक्षणिक व सान्निध्यवर्धक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शासकीय वसतिगृहासाठी निधी तसेच निवासी मुलींसाठी इनडोअर गेम्स व इतर शैक्षणिक व सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१७-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) विभागाच्या दिनांक १३/०२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नागपूर येथील संत चोखामेळा १००० मुला-मुलीचे वसतिगृह, नागपूर या वसतिगृहाच्या बांधकामासाठी रुपये ७६.८३ कोटी इतक्या रक्कमेला मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून सदर कामाकरीता निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शाहू, फुले, आंबेडकर निवासी अनुसूचित जाती खाजगी आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान लागू करणेबाबत

**(१२) ३२२२ (१०-०७-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अमोल मिटकरी, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहू, फुले, आंबेडकर १६५ निवासी आश्रमशाळांच्या निवास, अनुदान व इतर मागण्यांबाबत आझाद मैदान, मुंबई येथे दिनांक २३ जानेवारी,२०२३ रोजी आमरण उपोषण करण्यात आले होते यासंदर्भात दिनांक ३० जानेवारी,२०२३ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास निवेदन सादर करण्यात आले असून त्याअनुषंगाने मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्या कार्यालयात प्रस्ताव सादर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागण्यांमध्ये संबंधित आश्रमशाळांना १००% वेतन अनुदान, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक व संच मान्यता, सेवासातत्य, तसेच विद्यार्थ्यांना १००% परिपोषण अनुदान देण्याबाबत सातत्याने पाठपुरावा करूनही आजतागायत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आश्रमशाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीच्या अनुषंगाने वेतन अनुदान प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (३०-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी आश्रमशाळा योजनेतील पात्र आश्रमशाळांना वि.जा.भ.ज. आश्रमशाळांच्या धर्तीवर वेतनश्रेणी व विद्यार्थ्यांना परिपोषण अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.
(३) शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (सा.न्या.) महोदयांकडे दिनांक १३/०५/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मंत्री (सा.न्या.) महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वि.जा.भ.ज. आश्रमशाळांच्या धर्तीवर वेतनश्रेणी किंवा केद्रीय आश्रमशाळांच्या धर्तीवर मानधन देण्याच्या अनुषंगाने सदर आश्रमशाळांची यु-डायस प्रणालीवरील माहिती तपासून सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना कळविण्यात आले असून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जमीन खरेदी विक्री व्यवहारासाठी भूमी अभिलेख विभागाकडे मोजणी नकाशा जोडणे बंधनकारक असल्याबाबत

**(१३) ३२८६ (१०-०७-२०२५) श्री.संजय केणेकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारासाठी दिनांक १ मे, २०२५ पासून भूमी अभिलेख विभागाकडून प्राप्त मोजणी नकाशा जोडणे बंधनकारक करण्यात आले असून अशा नवीन अटीमुळे मोजणी नकाशा न जोडल्यास मुद्रांक कार्यालयात जमीन व्यवहार नोंदवले जाणार नाहीत असा बदल नव्या कायद्यानुसार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्या मुद्रांक कायद्यात व नियमांमध्ये कोणकोणते बदल करण्यात आले आहेत आणि त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदर कायद्यातील बदल व भूमी अभिलेख कार्यालयात आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना मोजणी नकाशा मिळविण्यासाठी कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागत असून, जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये अडथळे निर्माण होऊन व्यवहारांची गती संथ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील नागरिकांना मोजणी नकाशे वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०४-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) लागू नाही.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार सन २०२५ चा महाराष्ट्र क्रमांक २३, दिनांक २८ एप्रिल, २०२५ नुसार नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम १८,२१ व २२ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम १८ क (१) मधील सुधारणा खालीलप्रमाणे आहे.

कलम १८ क (१) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पुढील दस्तऐवजांचे प्रवर्ग नोंदणीकरीता नाकारण्यात येतील.

(क) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा राज्य अधिनियमाव्दारे ज्यास मनाई केलेली आहे अशा संव्यवहारांशी संबंधित दस्तऐवज. नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम २१ (१) मधील (१) मध्ये सुधारणा करुन "अशा मालमत्तेची ओळख पटण्याइतपत तिचे वर्णन अंतर्भूत नसेल तर या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल त्यामध्ये अशा मालमत्तेची ओळख पटण्याइतपत पुरेसे वर्णन आणि त्यासोबत या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे राज्य शासनाव्दारे विहित करण्यात येतील अशी कागदपत्रे व दस्तऐवज" असे अंतर्भूत करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०८/०८/२०२३ अन्वये बागायती क्षेत्रासाठी १० आर व जिरायत क्षेत्रासाठी २० आर असे प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे नोंदणी अधिनियमातील उपरोक्त तरतुदीनुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या मिळकतींची खरेदी-विक्री करता येत नाही, प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या खरेदी-विक्री व्यवहारांच्या दस्तांसोबत सक्षम प्राधिकारी यांचे परवानगी आदेश अथवा मंजूर केलेला हद्द कायम केलेला नकाशा सादर केल्यास दस्त नोंदणी करण्यात येते.

(३) सदर सुधारणा आल्यानंतर माहे मे, २०२५ मध्ये २,६५,१३० इतकी दस्त नोंदणी झाली आहे. तर मागील वर्षी याच कालावधीत माहे मे, २०२४ मध्ये २,६२,५२२ इतकी दस्त नोंदणी झाली होती. त्यामुळे गुंठ्यातील शेतीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहारावर व दस्त नोंदणीवर परिणाम झालेला नाही.
(४) या कार्यालयाशी संबंधित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वनक्षेत्रात अतिक्रमण करण्यात आल्याबाबत

**(१४) ३७७० (१७-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ५७५ वर्ग किलोमीटर इतक्या वनक्षेत्रावर माहे मार्च, २०२४ च्या अखेरपर्यंत अतिक्रमण झाल्याचे केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने माहे फेब्रुवारी, २०२५ मधील आकडेवारीत नमूद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमण राज्यातील कोणकोणत्या जिल्ह्यात आणि किती क्षेत्रावर झाले आहे तसेच सदर अतिक्रमित वनक्षेत्र पुन्हा ताब्यात घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०८-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. महाराष्ट्र राज्यातील माहे मार्च, २०२४ अखेर वनक्षेत्रावरील अतिक्रमण एकूण ५७५५४.८६९८ हे.आर आढळून आले असून ते खालीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | वनवृत्त | अतिक्रमीत क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर | ८६२३.९१९० |
| २ | चंद्रपूर | ७१८२.३६०० |
| ३ | धुळे | २१९०७.६३७० |
| ४ | यवतमाळ | २१७१.१८०० |
| ५ | ठाणे | २८६०.५८२७ |
| ६ | अमरावती | २३०४.३९८० |
| ७ | कोल्हापूर | १६५८.८२७३ |
| ८ | नागपूर | २४७३.६२६० |
| ९ | पुणे | ४६१.६७०० |
| १० | नाशिक | ५१२.५९४८ |
| ११ | गडचिरोली | ७३९८.०७५० |
| | एकूण | **५७५५४.८६९८** |

वनक्षेत्रावरील अतिक्रमणाच्या अनुषंगाने भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम २६(१)(h) व कलम ३३ (१) (c) अंतर्गत वन गुन्हा नोंद करण्यात येतो. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५३ व ५४ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येते.

बहुतांशी प्रकरणांमध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अंतर्गत वनहक्क दावे दाखल करण्यात आलेले असतात. सदर प्रकरणांमध्ये जिल्हास्तरीय वनहक्क समितीने दावा नाकारल्यास तद्नंतर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येते. अतिक्रमण काढताना महसूल विभाग, पोलीस विभाग, राज्य राखीव पोलीस दल, व वन विभाग यांच्याव्दारे संयुक्त कार्यवाही करण्यात येते. राज्यातील जंगल क्षेत्रातील अतिक्रमण रोखण्यासाठी तसेच वनक्षेत्राचे संरक्षण करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

DGPS सर्व्हे पध्दतीचा वापर करुन बाऊंड्री पिल्लर्स व्दारे वन जमिनीचे सिमांकन करुन अतिक्रमण होण्यास प्रतिबंध करण्याची कार्यवाही करण्यात येते.

शहरी भागामध्ये संवेदनशील वनक्षेत्रामध्ये अतिक्रमण होऊ नये यासाठी वनक्षेत्राला संरक्षक भिंत बांधण्याची कार्यवाही करण्यात येते.

अतिक्रमण होऊ नये यासाठी महसूल व वन विभागाचे वनक्षेत्राबाबतचे अभिलेख तपासून तफावत दूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

क्षेत्रिय कर्मचाऱ्यांव्दारे नियमित गस्त करुन अतिक्रमण निदर्शनास येताच ते काढण्याची कारवाई करण्यात येत असते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील व्याघ्र प्रकल्पातील ४५ गावांचे पुनर्वसनाबाबत

**(१५) ३९८० (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ६ व्याघ्र प्रकल्प असून या प्रकल्पांच्या क्षेत्रातील सुमारे ४५ गावांतील ४५९ कुटुंबांचे पुनर्वसन अद्याप झाले नसल्याची बाब दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर व्याघ्र प्रकल्पातील ४५ गावांतील ४५९ कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१७-१०-२०२५) :** (१) राज्यात असलेले ६ व्याघ्र प्रकल्पाचे कोर क्षेत्रात एकूण ८४ गावे होती. त्यापैकी ७० गावातील ८५५४ कुटुंबांचे पुनर्वसन प्रचलित शासन निर्णयानुसार करण्यात आलेले आहे. ३ व्याघ्र प्रकल्पातील १४ गावातील २७१६ कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबतची कार्यवाही चालू आहे.

(२) सदर १४ गावांपैकी ८ गावे मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील, ५ गावे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील व १ गाव पेंच व्याघ्र प्रकल्पामधील आहे. व्याघ्र प्रकल्पातील गावांचे पुनर्वसन पूर्णपणे ऐच्छिक असून गावकऱ्यांची संमती मिळाल्याशिवाय पुनर्वसन प्रक्रिया सुरू होत नाही. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील ८ गावांची संमती प्रक्रिया सुरू आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील ३ गावांचे पुनर्वसनासाठी वनजमिनीची निवड करण्यात आली असून वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत मान्यतेसाठी प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. २ गावांसाठी १५८.३१ हे. आर वनजमीन वळतीकरणाच्या प्रस्तावास केंद्र शासनाची टप्पा २ मान्यता प्राप्त झालेली असून पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पातील १ गावाबाबत चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त होताच पुनर्वसन प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वन सेवकांच्या व आदि वनरक्षकाची पदे भरण्याबाबत

**(१६) ३९९५ (१७-०७-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन विभागात सध्या वन सेवकांच्या १२ हजार ९९१ जागा, आदि वनरक्षक पदाच्या १ हजार ६०० पेक्षा अधिक जागा रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदांवरील मनुष्यबळाच्या अभावामुळे वन विभागावर कामाचा ताण पडतू असून वनसंवर्धन तसेच कायद्याची अंमलबजावणीवर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वन सेवकांच्या तसेच आदि वनरक्षकाची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१८-०८-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) वनसेवकांची पदे अस्तित्वात नसल्यामुळे सदर पदे रिक्त असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सद्य:स्थितीत वनरक्षकाची ९६६ पदे रिक्त असून सदर पदे सरळसेवा भरतीप्रक्रियेमार्फत भरण्याची कार्यवाही प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर या कार्यालयामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील एकाकी पडलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या जमिनी व मालमत्ता बळकावण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत

**(१७) ४२१६ (१७-०७-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर इत्यादी महानगरांमध्ये गत काही वर्षांमध्ये परदेशात स्थायिक झालेल्या मुलांमुळे एकाकी पडलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या जमिनी व मालमत्ता बळकावण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याची बाब माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत तीन वर्षांमध्ये अशा जमिनी अथवा मालमत्ता बळकावण्याच्या किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी किती प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, दाखल गुन्ह्यांपैकी किती प्रकरणांचा तपास पूर्ण झाला असल्यास, संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी "ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७" अंतर्गत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१५-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या जागेवर विविध उपक्रम राबविण्याबाबत

**(१८) ४४३० (१७-०७-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या सुमारे ३०,००० एकर जमिनीवर विविध उपक्रम राबवून ५०० कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न वाढविण्याचे उद्दिष्ट मा.महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शेती महामंडळाला देण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील शेती महामंडळाची जमीन वखार महामंडळास व्यवसायासाठी हस्तांतरित करणे, शेती महामंडळाच्या जमिनीवर संयुक्त शेती पध्दतीने पीक योजना राबविणे तसेच १४ शेती मळ्यांवरील वापरण्यास योग्य नसणारी घरे रिक्त करणे आदी प्रस्तावाबाबत निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेती महामंडळाच्या मालकीच्या जमिनीवर राज्यातील पशुधनासाठी वैरण विकास कार्यक्रम राबविणे, शेतकऱ्यांना स्वस्त दरात चारा उपलब्ध करून देणे तसेच संयुक्त पध्दतीने पीक योजना राबविणे यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या सुमारे ३०,००० एकर जागेवर विविध उपक्रम राबवून ५०० कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न वाढविण्याचे उद्दिष्टाबाबत मा.महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. शेती महामंडळाकडे उपलब्ध असणाऱ्या जमीनीचा सद्य:स्थितीतील वापर व सुयोग्य नियोजन करुन शेती महामंडळाचे उत्पन्न वाढविणे हे त्यामध्ये अभिप्रेत होते. त्या अनुषंगाने उत्पन्न वाढीच्या उपायांची खात्री करणे व उपाययोजना राबविणेसंदर्भात शक्यता पडताळणेबाबत मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांनी मा.व्यवस्थापकीय संचालक यांना तोंडी निर्देश दिले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मा.संचालक मंडळाच्या दिनांक २४/०४/२०२५ रोजी झालेल्या ३२७ व्या बैठकीमध्ये विषय क्र.३२७/११ अन्वये मौजे कोकमठाण, ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर येथील शेती महामंडळाची जमीन वखार महामंडळास हस्तांतरीत करणेबाबत ठराव करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ राज्यशासनाचा उपक्रम असणारे महामंडळ असून महामंडळाकडे असणारी जमीन ही शासनास भोगाधिकार मुल्य प्रदान केल्यानंतर महामंडळास प्रदान करण्यात आलेली आहे. शेती महामंडळाच्या जमिनींचे २७७ ब्लॉक तयार करण्यात आलेले असून मा.संचालक मंडळाने दिलेल्या मंजूरी अन्वये सन २०१४ पासून सदर जमीनीवर महामंडळामार्फत ई-निविदा राबवून संयुक्त शेतीधारकांस १० वर्षे कराराने जमीन संयुक्त शेतीसाठी उपलब्ध करुन दिली जाते.

तसेच संचालक मंडळाच्या ३२७ व्या बैठकी मध्येच विषय क्र. ३२७/१७ अन्वये शेती महामंडळाच्या १४ शेत मळयांवरील वापरण्यास योग्य नसणारी व ५० वर्षे जुनी असणारी व स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये राहण्यासाठी अयोग्य ठरवण्यात आलेली निवासस्थाने नैसर्गिक आपत्ती परिस्थितीत पडून जिवीत हानी व वित्त हानी टाळणेच्या दृष्टीने तात्काळ रिक्त करणेकामी स्थावर व्यवस्थाकांमार्फत योग्य ती कार्यवाही करणेबाबत ठराव मंजूर करण्यात आला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

शेती महामंडळाच्या मालकीच्या जमिनीवर राज्यभरातील पशुधनासाठी वैरण विकास कार्यक्रम राबविणे, शेतकऱ्यांना स्वस्त दरात चारा उपलब्ध करुन देणे याबाबत कोणतीही कार्यवाही महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचेमार्फत केली जात नाही.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ राज्यशासनाचा उपक्रम असणारे महामंडळ असून महामंडळाकडे असणारी जमीन ही शासनास भोगाधिकार मुल्य प्रदान केल्यानंतर महामंडळास प्रदान करण्यात आलेली आहे. शेती महामंडळाच्या जमिनींचे २७७ ब्लॉक तयार करण्यात आलेले असून मा.संचालक मंडळाने दिलेल्या मंजूरी अन्वये सन २०१४ पासून सदर जमीनीवर महामंडळामार्फत ई-निविदा राबवून संयुक्त शेतीधारकांस १० वर्षे कराराने जमीन संयुक्त शेतीसाठी उपलब्ध करुन दिली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात प्रस्तावित असलेल्या नवीन विमानतळ प्रकल्पामुळे परिसरातील जमिनींचे बोगस दस्तनोंदणी होत असल्याबाबत

**(१९) ४४५५ (१७-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात प्रस्तावित असलेल्या नवीन विमानतळ प्रकल्पामुळे परिसरातील जमिनींचे दर झपाट्याने वाढल्याने गावांमध्ये बोगस दस्तऐवज तयार करून जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संगनमत करून दलालाकडून बोगस कागदपत्रांच्या आधारे नव्या खरेदीदारांची नावे सातबारा उताऱ्यावर लावण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात होत असलेल्या फसवणूकीप्रकरणी संबंधित दलाल व शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (०१-०८-२०२५) :** (१) होय, हे अंशत खरे आहे.

दुय्यम निबंधक श्रेणी-१, पुरंदर यांच्या कार्यालयात माहे मार्च २०२५ मध्ये मौजे खानवडी येथील शेतजमिनीचे साठेखत २५०१/२२५ या क्रमांकाने मूळ मालकाऐवजी नोंदणीकृत झालेले आहे.

(२) हे खरे नाही.
(३) चौकशी दरम्यान मूळ व्यक्ती ऐवजी बनावट व्यक्ती असल्याचे स्पष्ट झाल्याने दुय्यम निबंधक, पुरंदर यांचेकडून नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ८२ नुसार कारवाई करण्यासाठी सासवड पोलीस स्टेशन यांना दिनांक ७/६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार दिनांक १८/०७/२०२५ रोजी प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी बहुल कर्जत (जि.रायगड) तालुक्यात दरवर्षी ८ ते १० अल्पवयीन मुली माता होत असल्याबाबत

**(२०) ४५२९ (१७-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाजासाठी शासनामार्फत विविध योजना तसेच जिल्हा नियोजन समित्यांच्या माध्यमातून विशेष उपयोजना राबविण्यात येत असल्या तरीही त्या योजनांचा लाभ अपेक्षेप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्यामुळे शिक्षणाचा अभाव, रोजगाराच्या मर्यादित संधी, व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांमुळे आदिवासी समाज शोषणास बळी पडत असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कातकरी (जि.रायगड) या विशेष दुर्बल घटक आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचा अभावामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत तसेच बालविवाह प्रथेला चालना मिळत असून अज्ञानामुळे आदिवासी बहुल कर्जत तालुक्यात दरवर्षी ८ ते १० अल्पवयीन मुली माता होत असून सदर मुली मुली बाळंतपणासाठी रुग्णालयात दाखल झाल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनास याबाबत कळवणे अनिवार्य असल्यामुळे संबंधित प्रकरणांमध्ये पोलिसांकडून तक्रारी दाखल केल्या जात असल्याचे दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांमध्ये 'पॉक्सो कायदा' अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यास बालकाच्या पित्याविरुध्द कारवाई करण्यात येत असल्याने परिणामी संपूर्ण कुटुंब उध्दवस्त होण्याची वेळ येते अशा परिस्थितीत जनजागृती आवश्यक असून यासाठी शासनाने आदिवासी समाजात जनजागृती, रोजगार निर्मिती व शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (१४-०८-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात सन २०२४-२५ मध्ये २७ व सन २०२५-२६ (मे अखेर) मध्ये ७ अल्पवयीन कातकरी समाजाच्या गर्भवती मातांची नोंद झालेली आहे. पोलीस अधीक्षक, रायगड यांच्या अहवालानुसार जानेवारी ते मे २०२५ पर्यंत पॉक्सो अंतर्गत आदिवासी समाजाशी संबंधित १२ प्रकरणी गुन्ह्याची नोंद असून त्यापैकी कर्जत तालुक्यातील २ प्रकरणे आहेत. त्यातील ५ प्रकरणी आरोपी न्यायालयीन कोठडीत असून ३ प्रकरणी आरोपी विधी संघर्षीत बालक असल्याने पालकांच्या ताब्यात आहे.

(३) राज्यातील आदिवासी समाजाला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी रोजगारभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो. स्वयंरोजगारासाठी वित्तीय सहाय्य करण्यात येते.

राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत ४९९ शासकीय, ५५६ अनुदानित, १६२ नामांकित, ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल कार्यरत असून त्यामध्ये सुमारे ५ लाखापेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन उच्च शिक्षणासाठी तसेच परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.